तक्रार युएलपी क्र.२१/२०२४
निशाणी क्रं. सी—१५

**तक्रारदारातर्फे ॲड. श्री.बी.डी.मनोळकर यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

मी विप संघात सन १९९४ मध्ये क्लर्क म्हणून नोकरीस लागलो. व्यवस्थापक हे पद मला पदोन्नतीने मिळाले आहे. मी व्यवस्थापक या पदावर अडीच वर्षापासून काम करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, विप दुध संघामध्ये कोल्हापूर जिल्हा दुध संघ कर्मचारी संघटना ही मान्यताप्राप्त संघटना कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मान्यताप्राप्त संघटनेसोबत वेळोवेळी करार झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कर्मचा—यांची वर्गवारी टी—६ पासून एस—१ पर्यंत करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, संघटनेसोबत झालेल्या करारातील पगार आणि इतर फायदे तक्रारदार यांना दिले जातात. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार प्रविण देसाई यांना व्यवस्थापकीय व प्रशासकीय स्वरूपाचे अधिकार नाहीत. तक्रारदार प्रविण देसाई यांना व्यवस्थापकीय व प्रशासकीय स्वरूपाचे अधिकार आहेत याबाबतचा पुरावा दाखल करू शकतो.

हे म्हणणे खरे आहे की, पशु खाद्य वाहतूकीचा ठेका वेगवेगळया वाहतुक संस्थांना दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी तालूका सहकारी वाहतुक संस्था गोठवडे ही एक संस्था आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनोहर डोंगळे हे राधानगरी तालूका सहकारी वाहतुक संस्था गोठवडे येथे क्लर्क म्हणून काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, वाहतुकीची बीले संस्थेकडून १५ दिवसांतून एकदा विप संस्थेकडे सादर केली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बीले ताब्यात घेवून त्याची पुढील कार्यवाही मार्केटींग विभागातील क्लर्क शुभम भोसले हे करत होते. हे म्हणणे खरे आहे की, किलोमीटर व टप्पे तपासून त्याची संगणकावर समरी तयार करण्याचे काम शुभम भोसले हे करत होते. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसलेने टप्प्यांत खाडोखोड कशी केली ही बाब वरीष्ठांच्या निदर्शनात कधीही आणून दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शुभम भोसलेच्या नियुक्तीनंतर तक्रारदार यांची नियुक्ती पशु खाद्य विभागात झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी तालूका सहकारी

वाहतुक संस्था गोठवडे संस्थेच्या बीलांमध्ये वाढ झाल्याचे लक्षात आल्यानंतर विप संस्थे तर्फे  राधानगरी तालूका सहकारी वाहतुक संस्था गोठवडे यांच्याकडे चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, विप संस्थेकडून दिनांक ११/०४/२०२४ च्या पत्रान्वये राधानगरी तालूका सहकारी वाहतुक संस्था गोठवडे यांच्याकडून आर्थिक घोटाळयाच्या चौकशीचा अहवाल मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२/०३/२०२४ रोजी राधानगरी तालूका सहकारी वाहतुक संस्था गोठवडे यांनी पत्रान्वये अहवाल सादर केला. हे म्हणणे खरे आहे की, मनोहर डोंगळे यांचा कबूली जबाब लक्षात घेता तो स्वत: आणि विप संस्थेच्या मार्केटींग विभागातील क्लर्क शुभम भोसले या दोघांनी संगणमत करून खाडाखोड केल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसलेने खाडाखोड केलेली कागदपत्रे वरीष्ठांपर्यंत पुढील कार्यवाही करीत असताना सादर केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मार्केटींग क्लर्क शुभम भोसले आणि मनोहर डोंगळे यांच्या व्यतीरीक्त तक्रारदार यांचा सदरच्या घटनेत कोणताही सहभाग नव्हता. साक्षीदार सांगतो की, तक्रारदार यांचा निष्काळजीपणा होता. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांचा शुभम भोसले यांच्या सोबत संगणमतात सहभाग नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांनी शुभम भोसले यांच्या सोबत संगणमत केले होते याबाबत पुरावा दाखल केला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांना कामावरून कमी करण्यापुर्वी कारणे दाखवा नोटीस देवून स्पष्टीकरण मागण्यास अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, बडतर्फीच्या आदेशातील कारणे चुकीची व बेकायदेशीर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेची अंतर्गत आणि वैधानीक तपासणी झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाढीव रक्कम संबंधीत संस्थेकडून वसूल करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराच्या निष्काळजीपणामुळे विप संस्थेचे आर्थिक नुकसान झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पशु खाद्य विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची घट आणि त्यावर परिणाम झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पशु खाद्य विक्रीमध्ये घट आणि त्यावर परिणाम झाला आहे याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेच्या बीलाबाबत बात निदर्शनास आल्यानंतर तक्रारदार यांची वेगवेगळया ठिकाणी दिनांक १३/०३/२०२४ च्या आदेशाने बदली केली. हे म्हणणे

खरे नाही की, तक्रारदार यांची बदली प्रस्तुत घटनेतील सहभागाची शिक्षा म्हणून केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार याची बदली करण्यास प्रशासकीय कारण निर्माण झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांच्या बडतर्फ आदेशामध्ये संगणमताची कथने पुराव्या शिवाय केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रामध्ये संगणमताची कथने पुराव्या शिवाय केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रू. ३६,०१,०७१/— इतक्या रकमेचे आर्थिक नुकसान झाले आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, बडतर्फ आदेशातील कथीत घटने व्यतीरीक्त तक्रारदार यांचा पुर्व सेवा पट स्वच्छ व निष्कलंक आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटना निदर्शनास आल्यानंतर मार्केटींग क्लर्क शुभम भोसले याच्याकडे चौकशी करण्यासाठी श्री. बाजीराव राणे आणि व्ही.डी. पाटील यांना सुचना दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, बाजीराव राणे आणि व्ही.डी. पाटील यांनी शुभम भोसले बाबतचा अहवाल सादर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांच्याविरूध्द बडतर्फीच्या आदेशामध्ये केलेले आरोप अयोग्य व चुकीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी विप संघास मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

( के. बी. कामगौडा )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.

कोल्हापूर.
दिनांकः— ३१/०१/२०२६